संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पुलवामा हल्ल्याची पाळेमुळे आणि बांडगुळे

**काश्मीरमधल्या** पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याचे पडसाद वेगवेगळ्या पद्धतीने उमटू लागले आहेत. संपूर्ण देशामध्ये या ४३ जवानांच्या हौतात्म्याला अभिवादन केले जात असतानाच पाकिस्तानच्या कृतघ्नपणाचा तितक्याच कठोरपणे बदला घेतला पाहिजे अशी संतप्त भावनाही व्यक्त होत आहे. परंतु त्याचवेळी देशात लपून बसलेल्या गद्दारांकडून शत्रुला साथ देणारी कृत्येही होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. देवळाली इथले लष्करी छावणी असलेले रेल्वे स्थानक उडवून देण्याची धमकी दिली आहे. ही धमकी निनावी फोनद्वारे आल्याने आता त्याचा कसोशीने शोध सुरू आहे. तसाच प्रकार पुण्याच्या हिंजवडीतल्या आय टी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसराबाबत घडला आहे. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांना याप्रकारची माहिती मिळाल्याबरोबर हिंजवडीच्या आय टी हब ची सुरक्षा व्यवस्था वाढविली गेली आहे. माहिती तंत्रज्ञानात येणाऱ्या मोबाईल इंटरनेट फेसबुक इंस्टाग्राम या माध्यमांचा वापर करून दहशतवादी आपले संदेश पोहोचवतात. कदाचित याच माहिती तंत्रज्ञानामुळे दहशतवाद्यांचं रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे. याशिवाय हिंजवडीमधला आय टी हब देशातला मोठा प्रकल्प मानला जातो. त्याठिकाणी काही दहशतवादी कृत्ये करून एकाच वेळी अनेक ठिकाणी अस्थिरता माजवण्याचा प्रयत्न पुन्हा होऊ शकतो. देवळालीची लष्करी छावणी किंवा हिंजवडीचा आय टी प्रकल्प लक्ष्य करण्यामागे पुलवामासारखेच मोठे कारस्थान असू शकते. एका मोठ्या हल्ल्याची जखम ठसठसत असताना देशाच्या इतर भागात अशाच प्रकारची दहशत वाढविण्याचे प्रयत्नही त्यातून दिसून येतात. याचा अर्थ देशातले लपून बसलेले गद्दार तितक्याच कठोरतेने शोधायला हवेत. किंवा दहशतवाद्यांनी देशाच्या इतर भागातही आपले जाळे पसरून दहशतीसाठी वातावरण तयार केलेले दिसते. त्यातही पुन्हा एकदा महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या प्रगत राज्यातल्या दोन ठिकाणांबाबत घडलेला हा प्रकार अधिक चिंताजनक ठरतो. कारण आज अशी वेळ आली आहे की कोणत्याही धमकीकडे किंवा अफवेकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. सरकारने किंवा लष्कराने आपले सगळे लक्ष पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना धडा शिकविण्यावर केंद्रित केले असताना या सुरक्षा यंत्रणांचे लक्ष विचलित करण्यासाठीसुद्धा हा धमक्यांचा खेळ खेळला जात असावा. म्हणूनच कोणत्याही प्रकाराबाबत दिरंगाई ढिलाई किंवा दुर्लक्ष करणे परवडणार नाही.

### घरभेद्या गद्दारांची पिलावळ

या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए- महम्मद या संघटनेने घेतली. तिचा म्होरक्या मसूद अझहर पाकिस्तानात राहून सगळी सूत्रे हलवतो आणि आश्चर्याची गोष्ट अशी की भारतातल्या अनेक तरुणांना आपल्या संपर्कात आणून दहशतवादी कृत्ये करण्यासाठी प्रवृत्त करतो. त्याच्या या आवाहनाला प्रतिसाद देणारी मानसिकता किंवा प्रवृत्ती देशाच्या काही भागात आहे हे यानिमित्ताने सिद्ध होते. वेगवेगळ्या माध्यमातून दहशतवाद किंवा अस्थिरता पसरविणारे हे घटक एकमेकांच्या संपर्कात आहेत. काश्मीरचा मुद्दा पुढे करून आणि धर्मांधतेचा हा विद्रूप चेहरा थैमान घालत असतो. म्हणूनच या दहशतवादाची पाळेमुळे ज्या पाकिस्तानात आहेत त्याचे कंबरडे तर मोडले पाहिजेच. परंतु भारतात राहून इथल्या समाजाला पोखरणारी ही बांडगुळेही उद्ध्वस्त केली पाहिजे. हिंजवडी आय टी हब ला धोका असल्याचा इशारा जेव्हा केंद्रीय यंत्रणांना मिळतो तेव्हा त्याचे गांभीर्य अधिक वाढते. आणि एखादी व्यक्ती निनावी फोन करून दहशतीच्या मनसुब्याचे धाडस दाखवते तेव्हा देशांतर्गत असलेल्या या बांडगुळांची भीड अजून चेपली गेलेली नाही. पुलवामाच्या हल्ल्यानंतर खरेतर त्यांची पाचावर धारण बसायला हवी होती. पण अजूनही शिरजोर असल्याचेच चित्र पाहायला मिळते.

### देशातले पाक एजंट

एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष काश्मीरमध्येसुद्धा या ४३ जवानांच्या हौतात्म्यानंतर दुसऱ्याच दिवशी पुन्हा चार जवानांचे बळी गेले. याच्या मोबदल्यात केवळ तीन दहशतवाद्यांना आपण टिपू शकलो. वेळ तर अशी आली होती की घराघरात घुसून अख्खे काश्मीर खोरे पिंजून काढणे गरजेचे होते कारण आतापर्यंत मिळालेल्या पाकिस्तानच्या पैशामुळे ही पिलावळ दबा धरून बसली आहे. सतत सत्ता उपभोगणारे अब्दुल्ला घराणे किंवा मेहबूबा मुफ्ती किंवा इतर काँग्रेसी नेत्यांनी उघडपणाने ज्या हल्ल्याचा निषेध केला नाही. उलट पाकिस्तानशी चर्चा करूनच ही समस्या सुटेल अशी रदबदली केलेली आहे. क्रिकेटपटू आणि आता पंजाबमध्ये मंत्री असलेल्या नवज्योत सिद्धूने आपल्या अकलेचे जे तारे तोडले आहेत ते पाकिस्तानी एजंट असल्यासारखेच म्हणावे लागतात. त्याने केलेली भाषा फुटीरतावाद्यांच्या मानसिकतेशी जुळणारी ठरते. सर्जिकल स्ट्राइक ज्यावेळी केला गेला त्यावेळी तो खोटा आहे बनावट अशा प्रकारची बेबंद बकवास अरविंद केजरीवाल, संजय निरुपम यासारख्यांनी केली होती. लष्कराविषयीचा अविश्वास असलेली ही मानसिकता पुलवामा हल्ल्यानंतरही देशभक्तीविषयी किती प्रामाणिक असेल याविषयीच शंका येते. पाकिस्तानविषयी असाच कळवळा मणिशंकर अय्यर आणि यांच्यासारख्या अनेकांनी व्यक्त केला होता. यासाठीच पुलवामा हल्ल्याविरोधात संताप व्यक्त होत असताना त्याचे वेगवेगळ्या पद्धतीचे हे पडसाद लक्षात घ्यावे लागतील. पाळेमुळे आणि बांडगुळे ही दोन्हीही उद्ध्वस्त करावे लागतील.